विधान सभा

। सत्यमेव जयते ।

महाराष्ट्र

# निलेश ज्ञानदेव लंके

सदस्य, विधानसभा महाराष्ट्र
२२४ पारनेर-नगर मतदार संघ

संपर्क कार्यालय : न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी, पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
एल.आय.सी.ऑफीस समोर, ईगलप्राईड, बुरुडगांव रोड, अहमदनगर पिन : ४१४००१ मो.९८२२५१५२५८
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com

आ.का.पारनेर/४३०५ दिनांक : ०७/०७/२०२३

प्रती,
मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब,
उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

विषय :-माझ्या पारनेर-नगर मतदार संघातील खालील पर्यटन अंतर्गत मंजुरी कामाची स्थगिती उठवणे बाबत...

संदर्भ :- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांचे पत्र टी.डी.एस २०२२/०७/प्र.क्र.४१९/पर्यटन चे तात्काळ स्थगिती पत्र दि.२८/०७/२०२२.

१. टिडीएस २०२१/१२/प्र.क्र.८४२/पर्यटन मंजुरी शासन निर्णय.
२. टिडीएस २०२२/०३/प्र.क्र.२०६/पर्यटन मंजुरी शासन निर्णय.
३. टिडीएस २०२२/०६/प्र.क्र.३९२/पर्यटन मंजुरी शासन निर्णय.

महोदय,

वरील संदर्भीय विषयान्वये माझ्या पारनेर नगर मतदार संघातील खालील कामे पर्यटन क्षेत्राअंतर्गत मंजुर करण्यात आली होती व निविदा प्रक्रीया पुर्ण होऊन कार्यारंभ आदेश देणे बाकी होते परंतु दि.२८/०७/२०२२ चे शासन परिपत्रकानुसार पुढील कार्यवाहि करण्याच्या संदर्भात स्थगिती आदेश देण्यात आले ते असे पर्यटन उप-विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय योजने अंतग्रत दि.०१/०४/२०२१ पासुन आतापर्यंत मंजुर केलेल्या कामांपैकी निविदा मागविण्यात आल्या आहेत परंतु कार्यारंभ आदेश दिले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना स्थगिती देण्या बाबतचे प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्याबाबत चे पत्र संबंधीत विभागास देण्यात आले.

म्हणुन माझ्या मतदार संघातील पर्यटन विभागाअंतर्गत मंजुर झालेली कामे हि होणे गरजेचे आहेत.अनेक वर्षापासुन हि कामे होणे संदर्भात स्थानिक नागरीकांनी माझ्याकडे व पदमभुषण मा.श्री.आण्णासाहेब हजारे यांच्याकडे वारंवार मागणी करत होते.सदरील देवस्थाने हे तालुक्यातील मोठे देवस्थाने असुन त्या ठिकाणी कायम

स्वरुपी पर्यटक/भाविक भक्तगण मोठया प्रमाणात येत-जात असतात तसेच त्याठीकाणी वर्षभरात अनेक मोठ मोठे उत्सव देखील होतात असे असतांना त्या ठिकाणी अपुर्ण सुविधा असल्यामुळे पर्यटक/भाविकांनी नाराजी व्यक्त करतात. असे असल्यामुळे हि कामे होणे अत्यंत महत्वाचे आहेत म्हणुन आपण हया कामांची स्थगिती उठवण्यासंदर्भात संबंधीत विभागास आदेशीत करावे हि विनंती.

| अ.क्र | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | एन एच-६१ रोड ते मंदिर कुंड रोड कॉंक्रीटीकरण करणे.ता.पारनेर | ६५.०० लक्ष |
| २ | मौजे - निघोज येथे मळगंगा देवी परिसर सुशोभिकरण करणे,ता.पारनेर | ५५.०० लक्ष |
| ३ | मौजे-निघोज येथे मळगंगा देवी परिसरात पर्यटन विसावा केंद्र बांधकाम करणे.ता.पारनेर | २५०.०० लक्ष |
| ४ | मौजे-निघोज येथे मळगंगगा देवी परिसरात पर्यटन भोजन कक्ष बांधकाम करणे व संरक्षण भिंत बांधकाम करणे.ता.पारनेर. | १३०.०० लक्ष |
| ५ | अकोळनेर येथे खंडोबा देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ९९.०० लक्ष |
| ६ | अरणगाव येथे बुवाजी बुवा देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | १००.०० लक्ष |
| ७ | घोसपुरी येथे पद्मावती देवी देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ५०.०० लक्ष |
| ८ | करंदी मळगंगा देवी देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ७५.०० लक्ष |
| ९ | वडगाव दर्या येथे दर्याबाई वेल्हाबाई देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ५०.०० लक्ष |
| १० | सावरगाव येथे मारुती देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ५०.०० लक्ष |
| ११ | भाळवणी येथे श्री नागेश्वर देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे ता.नगर | ७५.०० लक्ष |

तरी वरील कामांची स्थगिती उठविण्यासंदर्भात संबधित विभागास आदेशीत करावे हि नम्र विनंती.कळावे,

आपला नम्र,

निलेश

( निलेश ज्ञानदेव लंके)

आमदार निलेश ज्ञानदेव लंके



विधान सभा

। सत्यमेव जयते ।

महाराष्ट्र

# निलेश ज्ञानदेव लंके


सदस्य, विधानसभा महाराष्ट्र
२२४ पारनेर–नगर मतदार संघ

संपर्क कार्यालय : न्यु आर्टस कॉलेज शेजारी, पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन– (०२४८८) २९५३३३
एल.आय.सी.ऑफीस समोर, ईगलप्राईड, बुरुडगांव रोड, अहमदनगर पिन : ४१४००१ मो.९८२२५१५२५८
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com


आ.का.पारनेर/ ९६३९ | दिनांक : २५/१०/२०२१

प्रति,

मा.ना.श्रीम.आदितीताई तटकरे
राज्यमंत्री, उद्योग,खनिकर्म,पर्यटन
क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- माझ्या पारनेर नगर मतदार संघातील मळगंगा देवी (ब वर्ग) पर्यटन क्षेत्रास विकास निधी मिळणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये माझ्या पारनेर-नगर मतदार संघातील मौजे निघोज हे गाव मोठया (३० हजार ) लोक संख्येचे गाव असुन या गावामध्ये मळगंगा देवीचे ब वर्ग तिर्थ क्षेत्र असुन देवीच्या दर्शनास वर्ष भरात संपुर्ण राज्यातून किमान ४ ते ५ लाख भक्तगण दर्शनास येतात तसेच मंदिराच्या शेजारीच कुकडी नदी असुन नदीत रांजणखळगे आहेत नदीच्या विरुदध बाजुस पुणे जिल्हा असुन ही नदी जुन्नर तालुक्यातुन येत असुन ती खाली उजनी धरणास जाऊन मिळते. सदरचे ठिकाण प्रेक्षणीय असल्यामुळे देखील पर्यटक येथे गर्दी करतात परंतु सदरील देवस्थानास पर्यटनाच्या सुविधा अपुर्ण असल्यामुळे त्यांची गैर सोय होते करीता आपणास खालील कामे सुचविले आहे तरी आपण संपुर्ण कामांना प्राधन्यानं मंजुरी दयावी ही विनंती.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मौजे निघोज येथे मळगंगा देवी मंदिर परिसरात पर्यटक विसावा केंद्र बांधकाम करणे ता. पारनेर | १५०.०० लक्ष |
| २ | मौजे : निघोज येथे मळगंगा देवी मंदिर परिसरात पर्यटक भोजन कक्ष बांधकाम करणे व संरक्षण भिंत बांधकाम करणे.ता.पारनेर | १००.०० लक्ष |
| ३ | NH-६१ रोड ते मंदिर कुंड रोड कॉंक्रीटीकरण करणे व स्ट्रीट लाईट बसविणे ता. पारनेर | ७०.०० लक्ष |
| ४ | मौजे निघोज येथे मळगंगा देवी मंदिर परिसरात वाहनतळ कॉंक्रीटीकरण करणे ता. पारनेर | ८०.०० लक्ष |
| ५ | मौजे निघोज येथे मळगंगा देवी मंदिर परिसर सुशोभिकरण करणे ता. पारनेर | ९०.०० लक्ष |

तरी वरील सर्व कामांना मंजुरी देऊन सदरील कामांचे प्रस्ताव संबधित विभागास तत्काळ दाखल करण्यास आदेशित करावे.

कळावे.

**आपला नम्र**

निलेश लंके

**आ.निलेश ज्ञानदेव लंके**

पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०२१-२२ या वर्षामध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देण्याबाबत आणि सन २०२२-२३ या वर्षामध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देऊन निधी वितरित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०२३/०८/प्र.क्र.३४४/पर्यटन,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२३.

**संदर्भ :-** १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन पत्र, क्रमांक टिडीएस २०२२/०७/प्र.क्र.४१३ /पर्यटन, दि.२५.०७.२०२२ व दि.२८.०७.२०२२.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२२/०७/प्र.क्र.४१३ /पर्यटन, दिनांक ०२.११.२०२२.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टिडीएस २०२२/०७ /प्र.क्र.४१३/पर्यटन, दिनांक १६.११.२०२२.
४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२२/०७/प्र.क्र.४१३ /पर्यटन,दिनांक : ०५.१२. २०२२.

**<u>शासन निर्णय</u>** : प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत दि.०१.०४.२०२१ नंतर मंजुरी दिलेल्या कामांपैकी निविदा न काढलेल्या कामांबाबत तसेच ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत, अशा कामांबाबत पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, अशा सूचना संदर्भ क्रमांक १ येथील दि. २५.०७.२०२२ व दि.२८.०७.२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

२. सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या वर्षात वेगवेगळया शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी काही कामांबाबत संदर्भ क्र.२ येथील दि.०२.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय, दि.०२.११.२०२२ अन्वये पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देण्यात आलेल्या कामांसंदर्भात पुढील आदेश होईपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, अशा सूचना संदर्भ क्रमांक ३ येथील दि.१६.११.२०२२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या.

**अ) सन २०२१-२२ या वर्षात वेगवेगळया शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी खाली नमूद केलेल्या कामांबाबतची (शासन निर्णयानिहाय) स्थगिती उठविण्यात येत आहे :-**

**१) शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२१/१२/प्र.क्र.८४२/पर्यटन, दिनांक : ३१ जानेवारी, २०२२**

(रुपये लक्षात)

| अ.क्र. व जिल्हा | कामे | अंदाजित रक्कम | वितरीत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) रायगड- अलिबाग | डॉ. सलीम अली पक्षी अभ्यास व संशोधन केंद्र, किहिम, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील विकास कामे. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११) रायगड-अलिबाग | रोहा येथील हनुमान मंदिर परिसराचे सुशोभिकरण करणे, ता. रोहा, जि. रायगड | १०७.३३ | ७५.०० |
| १२) रायगड-अलिबाग | आक्षी, ता. अलिबाग येथील शिलालेख परिसराचे सौंदर्यीकरण करणे | १४.४० | १४.४० |
| १३) रायगड-अलिबाग | श्रीवर्धन समुद्रकिनारी अस्तित्वात असलेल्या धुपप्रतिबंधक बंधाऱ्यावर सुशोभिकरणाची कामे करणे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | १९१.०९ | १९१.०९ |
| १४) रायगड-अलिबाग | मोर्बा येथील गाव तलावाचे सुशोभिकरण व सुधारणा करणे, ता. माणगांव, जि. रायगड | ५००.०० | १५०.०० |
| १५) रायगड-अलिबाग | शिवथरघळ येथे मंदिराच्या मागील बाजूस गॅबियन वॉल (संरक्षक भिंत) बांधणे | ४७.५७ | ३०.०० |
| १६) रायगड-अलिबाग | उंबरखिंड येथील शिवतिर्थ समरभूमी विकास कामे, ता. खालापूर, जि. रायगड | ८२.४८ | ५०.०० |
| १७) रायगड-अलिबाग | रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, अलिबाग पोलीस परेड मैदानात पोलीस मित्र शिल्प उभारणे, ता. अलिबाग, जि. रायगड | १५.६८ | १५.६८ |
| १८) अहमदनगर | आनंदऋषीजी महाराज समाधी स्थळ परिसरात पायाभूत सुविधा पुरविणे अहमदनगर येथील विकास कामे | ५००.०० | ३००.०० |
| १९) अहमदनगर | मळगंगा देवी मंदिर मौजे निघोज, ता. पारनेर येथील विकास कामांबाबत | | |
| १ | मौजे निघोज येथे मळगंगा देवी परिसरात पर्यटन विसावा केंद्र बांधकाम करणे, ता. पारनेर | २५०.०० | ७५.०० |
| २ | मौजे निघोज येथे मळगंगा देवी परिसरात पर्यटन भोजन कक्ष बांधकाम करणे व संरक्षण भिंत बांधकाम करणे, ता. पारनेर | १३०.०० | ५०.०० |
| २०) बीड | मौजे लोणी, ता. शिरुर (का.) जि. बीड येथील श्रीक्षेत्र खंडोबाजीबाबा मंदिर देवस्था परिसर विकसित करणेबाबत | ४१९.१३ | ९०.०० |
| २१) हिंगोली | श्री. बाराशिव हनुमान मंदिर मौ. बाराशिव, ता. वसमत, जि. हिंगोली येथील विकास कामे | २००.०० | ५०.०० |
| | एकूण १ ते २१ | ४९४७.४१ | २१२८.४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | दारणा डॅम परिसरात साकुर गावात महादेव मंदिर ते मारुती मंदिर रस्ता | ९०.०० | २७.०० |
| ५ | दारणा डॅम महादेव साकुर येथे पावर स्टेशन महोदव मंदिर | ६०.०० | १८.०० |
| | **एकूण** | **३००.००** | **९०.००** |
| | | | |
| ३३) अहमदनगर | NH-६१ रोड ते मंदिर कुंड रोड कॉक्रीटीकरण करणे ता. पारनेर | ६५.०० | १३.०० |
| | | | |
| ३४) अहमदनगर | मौजे निघोज येथे मंळगंगा देवी परिसर सुशोभिकरण करणे, ता. पारनेर | ५५.०० | ११.०० |
| ३५) अहमदनगर | अहमदनगर हद्दतील प्रभाग क्र. १ मध्ये भिस्तबाग महाल सुशोभिकरण करणे | १५०.०० | ५०.०० |
| | | | |
| ३६) अहमदनगर | अरणगाव, मेहेराबाद येथील केडगाव ते अरणगाव (मेहेरबाबा) समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता (१/१०० ते ३/५००) तयार करणे, ता. जि.अहमदनगर | १००.०० | ५०.०० |
| | | | |
| ३७) अहमदनगर | राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ काटवन खंडोबा चौक ते पुणे बसस्थानक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आनंद ऋषीची महाराज यांच्या समाधीकडे जाणाराव परिसरातील रस्ते काँक्रीटीकरण करणे | ४९९.९२ | २५०.०० |
| | | | |
| ३८) अहमदनगर | रंधा फॉल, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे काचेचा सेतु पुल बांधणे | २५०.०० | १००.०० |
| | | | |
| ३९) जळगाव | श्री बद्रिनाथ मंदिर संस्थान, बहादरपूर येथील विकास कामे ता. पारोळा, जि. जळगाव | ४००.०० | १००.०० |
| | | | |
| ४०) गोंदिया | नवेगांव बांध येथील (१२ कामे) पर्यटन विकास कामे जि. गोंदिया, ता. अजुर्नी-मोर | १५०.०० | ५४.०० |
| | | | |
| ४१) गोंदिया | प्रतापगड येथील (१७ कामे) पर्यटन विकास कामे जि. गोंदिया, ता. अर्जुनी-मोर | १७०.०० | ६१.०० |
| | | | |
| ४२) गोंदिया | चोरखमारा येथील (१६ कामे) पर्यटन विकास कामे जि. गोंदिया, ता. तिरोडा | २३३.४० | ८४.०० |
| | | | |
| ४३) गोंदिया | बोधलकसा येथील (१५ कामे) पर्यटन विकास कामे जि. गोंदिया, ता. तिरोडा | २१७.३० | ७८.०० |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणे, ता. इगतपुरी | | |
| ४१) नाशिक | दारणा डॅम परिसरात साकुर येथे महादेव परिसरात सुशोभिकरण करणे, ता. इगतपुरी | ३०.०० | ९.० |
| ४२) नाशिक | दारणा डॅम परिसरात पॉवर स्टेशन ते महादेव मंदिर परिसरात रस्ता करणे व सुशोभिकरण करणे, ता. इगतपुरी | ३०.०० | ९.० |
| ४३) नाशिक | दारणा डॅम परिसरात साकुर येथे पॉवर स्टेशन महादेव मंदिर येथे वाहनतळ तयार करणे, ता. इगतपुरी | ३०.०० | ९.० |
| ४४) नाशिक | दारणा डॅम परिसरात साकुर येथील सद्रोदिन बाबा दर्गा परिसरात सुशोभिकरण करणे, ता. इगतपुरी | ३०.०० | ९.०० |
| ४५) नाशिक | भावली डॅम (भावली खु.) परिसर सुशोभिकरण करणे, ता. इगतपुरी (भाग-२) | ३०.०० | ९.०० |
| | | | |
| ४६) नाशिक | शिलाईमाता मंदिर बेझे ता. त्र्यंबकेश्वर येथील विविध विकास कामे | १००.०० | ३०.०० |
| | | | |
| ४७) नाशिक | गंगाद्वार तीर्थक्षेत्र येथील विविध विकास कामे मा.त्र्यंबकेश्वर | ३००.०० | ९०.०० |
| | | | |
| ४८) नाशिक | सुळेवाडी येथे महादेव मंदिर परिसर सुधारणा करणे व सुशोभिकरण करणे. | १००.०० | ३०.०० |
| ४९) अहमदनगर | अहमदनगर मनपा हद्दीतील कल्याण रोड ठाणगे मळा ते अमरधाम पर्यंत लगतची सीना नदी सुशोभिकरण करणे | ३००.०० | ९०.०० |
| ५०) अहमदनगर | अहमदनगर मनपा हद्दीतील पुणे हायवे ते फुलसौंदर मळयापर्यंत लगतची सीना नदी सुशोभिकरणे करणे | ३००.०० | ९०.०० |
| ५१) अहमदनगर | अकोळनेर येथे खंडोबा देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | ९९.०० | २९.७० |
| ५२) अहमदनगर | अरणगाव येथे बुवाजी बुवा देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | १००.०० | ३०.०० |
| ५३) अहमदनगर | घोसपुरी येथे पद्मावती देवी देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. पारनेर | ५०.०० | १५.०० |
| ५४) अहमदनगर | करंदी मळगंगा देवी देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | ७५.०० | २२.५० |
| | | | |
| ५५) अहमदनगर | वडगाव दर्या येथे दर्याबाई-वेल्हाबाई देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | ५०.०० | १५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५६) अहमदनगर | सावरगाव येथे मारुती देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | ५०.०० | १५.०० |
| ५७) अहमदनगर | भाळवणी येथे श्री नागेश्वर देवस्थान परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधणे, ता. नगर | ७५.०० | २२.५० |
| ५८) अहमदनगर | मौजे कोतुळ येथे कोतुळेश्वर महादेव ता. अकोले येथील विकास करणे | १५०.०० | ४५.०० |
| | | | |
| ५९) अहमदनगर | रंधा फॉल ता. अकोले जि. अहमदनगर काचेचा सेतू पुल बांधणे | २००.०० | ६०.०० |
| ६०) अहमदनगर | श्री राघवेश्वर महादेव मंदिर परिसर सुशोभिकरण करणे, मौजे कुंभारी | ४९.९९ | १४.९९ |
| ६१) अहमदनगर | श्री खंडोबा देवस्थान परिसर सुशोभिकरण करणे, मौजे वाकडी, ता. कोपरगाव | ४९.९४ | १४.९८ |
| ६२) अहमदनगर | श्री नरहरी देवस्थान परिसर सुशोभिकरण करणे, मौजे कान्हेगाव, ता. कोपरगाव | ४९.९८ | १४.९९ |
| | | | |
| ६३) सोलापूर | श्री क्षेत्र श्री संत शिरोमणी सावता महाराज देवस्थान अरण ता. माढा, जि. सोलापूर येथील विकास कामे | | ५४.४५ |
| १ | दर्शन रांग बांधणे | ११६.७२ | |
| २ | पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५४.१४ | |
| ३ | रस्ता करणे. | १०.६५ | |
| | **एकूण** | **१८१.५१** | **५४.४५** |
| | | | |
| ६४) सोलापूर | वडवळ श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान येथे जि.प. शाळेजवळ वाहनतळ उभारणे, ता. मोहोळ, जि. सोलापूर | ३८.६६ | ११.५९ |
| ६५) सोलापूर | शेटफळ श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात शौचालय बांधणे, ता. मोहोळ | १०.०० | ३.०० |
| ६६) सोलापूर | शेटफळ श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात वाहनतळ उभारणे, ता. मोहोळ | १०.०० | ३.०० |
| ६७) सोलापूर | बेगमपूर-बेगम, माँ साहेब देवस्थान परिसरात वाहनतळ उभारणे, ता. मोहोळ, जि. सोलापूर | २०.७७ | ६.२३ |
| ६८) सोलापूर | बेगमपूर-बेगम, माँ साहेब देवस्थान परिसरात घाट बांधणे, ता. मोहोळ, जि. सोलापूर | ६०.७५ | १८.२२ |
| ६९) अमरावती | शेकदरी सिंचन प्रकल्प ता. वरुड सिंचन प्रकल्प येथे विपश्यना व निसर्ग जल पर्यटन केंद्र उभारणे | २५०.०० | ७५.०० |
| ७०) औरंगाबाद | श्री. हनुमान टेकडी येथे पाथवे व परिसर सुशोभिकरण करणे व इतर संकीर्ण कामे | १००.०० | ३०.०० |
| ७१) बीड | रेणुका देवी देवस्थान, पौळ पिंपरी, ता. परळी येथील देवस्थान परिसर विकसित करणे | १००.०० | ३०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८४) हिंगोली | मौजे माळवटा, ता. वसमत येथे महादेव मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | ३०.०० | ९.०० |
| ८५) हिंगोली | श्री बालाजी मंदिर परिसरात विद्युत पथदिवे बसविणे | १४.८० | ४.४४ |
| ८६) हिंगोली | मौजे थोरावा, ता. वसमत येथे उत्तरेश्वर महादेव मंदिर परिसरात मंगल कार्यालय सभागृह, यात्री निवास, संरक्षण भिंत, गार्डन व सुशोभिकरण करणे | १००.०० | ३०.०० |
| ८७) परभणी | मौजे रत्नेश्वर खुर्द येथील पर्यटन विषयक विकास कामे ता. पाथरी, जि. परभणी | १००.०० | ३०.०० |
| | **एकूण १ ते ८७** | **११०२१.२६** | **३३०६.३७** |

२) शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२२/०६/प्र.क्र.३९२/पर्यटन, दिनांक : २८ जून, २०२२ अन्वये खालील तक्त्यामधील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाशी संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रत्यक्षात अर्थसंकल्पीय प्रणालीवर निधी वितरित करण्यात आला नव्हता. सदर शासन निर्णयात नमूद कामांपैकी खालील कामांबाबत पुढील कार्यवाही करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच सदर कामांकरीता स्तंभ क्रमांक ४ येथे नमूद केल्यानुसार निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरित करण्यात येत आहे. (महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ)

(रुपये लक्षात)

| अ.क्र. | कामे | अंदाजित रक्कम | वितरीत रक्कम | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) रत्नागिरी | भैरवगड ता. चिपळूण, जि.रत्नागिरी येथे सभामंडप बांधणे | ३०.०० | ९.०० | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ |
| २) रत्नागिरी | मौजे डेरवण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी ग्रामपंचायत येथे सुशोभिकरण करणे | ३०.०० | ९.०० | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ |
| | एकूण १ ते २ | ६०.०० | १८.०० | |

३. <u>अटी व शर्ती</u> :-

१) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

२) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील व जादा खर्चा प्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

३) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च ३१ मार्च, २०२४ पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

४) पर्यटन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून केलेल्या कामाच्या ठिकाणी सदर कामे पर्यटन विभागाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून केली असल्याबाबतचे फलक लावण्यात यावेत.

५) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

६) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंतपणे करण्यात यावी.

७) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

८) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) योजनेत्तर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात संबंधित जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरीता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटन स्थळ सर्व नागरीकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

११) सदर निधीतून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास व पर्यटन संचालनालयास न चुकता सादर करावीत.

१२) गुणनियंत्रण यंत्रणेद्वारे कामाची प्रत्यक्ष गुणवत्ता तपासणी केल्याचा प्रमाणित अहवाल तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा सचित्र दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता

प्रमाणपत्र न चुकता शासनास व पर्यटन संचालनालयास सादर करण्यात यावे. गुणनियंत्रण यंत्रणेद्वारे कामाची प्रत्यक्ष गुणवत्ता तपासणी केल्याचा प्रमाणित अहवाल तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुढील उर्वरित निधी वितरित केला जाईल.

१३) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणा व संबंधित संस्था यांची राहील.

४. सन २०२२-२३ मधील वरील ब) येथील अनुक्रमांक १ व २ तक्त्यामधील कामांसाठी वर नमूद करण्यात आलेला खर्च सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरीता अनुदाने (३४५२ १९५८) ३१ सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या (प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत) सहायक अनुदानाची रक्कम आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता जिल्हास्तरावरील कामांसाठी संबंधित सहायक जिल्हा नियोजन अधिकारी/ जिल्हा नियोजन अधिकारी यांना -आहरण व संवितरण अधिकारी॰ व संबंधित जिल्हाधिकारी यांना -नियंत्रण अधिकारी॰ म्हणून घोषित करण्यात येत आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाशी संबंधित कामांसाठी मुख्य लेखा अधिकारी, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना -आहरण व संवितरण अधिकारी॰ व सह संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना -नियंत्रण अधिकारी॰ म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम त्यांनी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई / संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करुन संबंधितांना वितरीत करण्यात यावी. सदर कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा.

५. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असून वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३ परिशिष्टामधील तपासणीसूची बाबींची व अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०९०८१२३८२८८३२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

MADAN GIRJU SONDE

Digitally signed by MADAN GIRJU SONDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=5f2ca7eecbf1d69ba49909a95bb51f6144c31e6511072bd3c3e0545414f2af5e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E04FB247FBE9189ABDD8D54046F658559E3B3D749A417EEB1DA2AB279A9BE388, cn=MADAN GIRJU SONDE
Date: 2023.09.08 15:59:15 +05'30'

**(मदन सोंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

२. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

३. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.

४. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

६. सर्व संबंधित जिल्हाधिकारी.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

८. सर्व संबंधित जिल्हा नियोजन अधिकारी.

९. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

१०. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.

११. वित्त विभाग (का.व्यय-१५/ अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.

१२. अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग,मंत्रालय, मुंबई.(यांना आदेशात नमूद करण्यात आलेल्या संबंधित नियंत्रण अधिकारी यांच्याकडे निधी वितरीत करण्याच्या विनंतीसह)

११. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

***